# प्रसिद्धी पत्रक

महावितरण कंपनीने त्यांच्या वार्षिक महसूलाची गरज आणि तोटा भरून काढण्यासाठी ५४६२ कोटी रुपयांच्या वीज दरवाढीस मंजुरी मागणारी याचिका राज्य वीज नियामक आयोगाकडे दाखल केली आहे. या संदर्भात राज्यातील वीज ग्राहकांची मते, सूचना किंवा आक्षेप जाणून घेण्यासाठी आयोगातर्फे येत्या १७ ऑगस्टपासून राज्यात जाहीर सुनावण्या घेण्यात येणार आहेत.

राज्यातील पाऊस आणि सणासुदीचे दिवस यांमुळे ग्राहकांना या सुनावणीसाठी त्या त्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपली मते, सूचना किंवा आक्षेप मांडता येणार नाहीत, असे काही ग्राहक प्रतिनिधींना वाटते. अशा कारणामुळे ज्यांना त्या त्या दिवशी सुनावणीच्या ठिकाणी प्रत्यक्ष हजर राहता येणार नाही, त्यांनी आपली लेखी स्वरुपातील निवेदने संबंधित ठिकाणी सुनावणीच्या तारखेपर्यंत किंवा २५ ऑगस्ट २००६ पूर्वी वीज नियामक आयोगाकडे पोहोचतील, अशा रीतीने पाठवावीत. २५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात होणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी निवेदने सादर करून अथवा प्रत्यक्ष हजर राहूनही अशा ग्राहकांना आपली मते मांडता येतील, असे आयोगाच्या सचिव श्रीमती मालिनी शंकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

राज्यातील जाहीर सुनावण्यांचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असेल-

१) दि. १७ ऑगस्ट २००६- (गुरुवार)-
विभागीय आयुक्त कार्यालयाचे सभागृह, अमरावती,
सकाळी १०. वा.

२) दि. १८ ऑगस्ट २००६ (शुक्रवार)-
विभागीय आयुक्त कार्यालयाचे सभागृह, नागपूर.
सकाळी १०. वा.

३) दि. २१ ऑगस्ट २००६ (सोमवार)-
विभागीय आयुक्त कार्यालयाचे सभागृह, औरंगाबाद,
सकाळी १० वा.

४) दि. २२ ऑगस्ट २००६ (मंगळवार)-
बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.
सकाळी १० वा.

५) दि. २४ ऑगस्ट २००६ (गुरुवार)-
विभागीय आयुक्त कार्यालयाचे सभागृह, पुणे.
सकाळी १० वाजता.

६) दि. २५ ऑगस्ट २००६ (शुक्रवार)-
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सभागृह,
जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई.
सकाळी ११ वाजता.

मुंबई,
दि. १४ ऑगस्ट २००६

(मालिनी शंकर)
मविनिआ, सचिव